**हलकी जमीन** : या प्रकारची जमीन सर्वसाधारण माळरान किंवा मुरमाड या नावाने ओळखली जाते. ही कठीण व खडकाळ असून रंग तांबूस असतो. कृष्णा खो-याच्या पूर्वेकडील भागात जमीन खूपच निकृष्ट आहे. तरीसुध्दा कोरेगाव तालुक्यात अनेक ओढ्यांच्या आणि नद्यांच्या काठी काळ्या जमिनीचे पट्टे आढळतात. डोंगरालगतची जमीन मात्र अतिशय निकृष्ट आहे. आणखी थोडे पूर्वेकडे गेल्यास जमीन साधारण खोलीची असून माण तालुक्याच्या मानाने खटाव तालुक्यात अशा जमिनीचे प्रमाण जास्त आहे. या वाळूमिश्रित जमिनीत चुनखडी व पोटॅशच्या भरपूर प्रमाणाबरोबरच नायट्रोजन, ऑरगॅनिक कार्बन व फॉस्फरसचे रासायनिक घटकही आढळतात. अशा जमिनीत बाजरीचे उत्पादन घेता येते. भरपूर खत घातल्याखेरीज अशा जमिनीत चांगले उत्पन्न येऊ शकत नाही.

**लॅटेराईट जमीन** : तांबडमाती नावाने ओळखली जाणारी ही जमीन महाबळेश्वरच्या डोंगरावर व कोयना नदीच्या सुरुवातीच्या खो-यात आढळते. तिच्यात काही ठिकाणी काळ्या व तांबड्या मृदेचे मिश्रण आढळते. या जमिनीचा उपयोग कुमरी लागवडीसाठी केला जातो. डोंगर उतारावर असल्यामुळे पावसाळ्यात तिची फार धूप होते, त्यामुळे तिच्यातील विद्राव मिठाचा अंश कमी होऊन लोहाचे प्रमाण वाढते. हिची खोली ३० सें.मी. ते ३ मी. असते. तिच्यात नायट्रोजनचे प्रमाण भरपूर असले तरी ऑरगॅनिक द्रव्याचे प्रमाण कमी असते. या जमिनीत मुख्यतः रागी, नाचणी, वरी व सावा ही पिके येतात. काही ठिकाणी कुमरी लागवडीमध्ये भाताचे पीक घेतले जाते. महाबळेश्वरच्या थंड हवेच्या ठिकाणी या जमिनीत स्ट्रॉबेरी, रासबेरीसारख्या फळांचे पीक घेतले जाते.

कृषि विभागाने कृषीच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील जमिनीचे (१) घाटातील पावसाचा प्रदेश, (झोन ३), (२) अतिपावसाचा तांबड मातीचा संक्रमण प्रदेश, (झोन ४), (३) अतिपावसाचा बिगर तांबड मातीचा संक्रमण प्रदेश, (झोन ५) व (४) विरळ पावसाचा प्रदेश (झोन ६) असे अनुक्रमे या चार विभागामध्ये विभाजन केले आहे. झोन ३ मध्ये कोयना व महाबळेश्वरचा डोंगरी विभाग, झोन ४ मध्ये पाटण व जावळी तालुक्यांचा मध्य विभाग, झोन ५ मध्ये कृष्णा खोरे व झोन ६ मध्ये उर्वरित भाग येतो. कृषि विभागाने धोम, रेठरे बुद्रुक, कोरेगाव व दहिवडी येथील मातीच्या नमुन्यांचे केलेले पृथःकरण तक्ता क्रमांक २ मध्ये दिले आहे.

## शेती हंगाम

खरीप हंगाम जूनमध्ये प्रारंभ होणा-या नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून असतो. क्वचित प्रसंगी पडणा-या रोहिणी नक्षत्रातील (मे अखेर) सरींचा उपयोग शेतीच्या पूर्व मशागतीस होतो. या हंगामात ज्वारी, बाजरी, भात, नाचणी, वरी, सावा, राळा, भुईमुग व तंबाखू ही पिके घेतात. खरीप पिकाची पेरणी जून-जुलैच्या मध्यापर्यंत व कापणी सप्टेंबरच्या मध्यापासून नोव्हेंबर अखेरपर्यंत होते. काही खरीप पिकांची कापणी व मळणी जानेवारीपर्यंत असते. रबी हंगाम ऑक्टोबरमध्ये सुरु होऊन मार्चमध्ये संपतो. या हंगामात रबी ज्वारी (शाळू), हरभरा व गहू ही महत्त्वाची पिके घेतात.

## जमिनीचे उपयोजन

जमिनीच्या क्षेत्राच्या वर्गीकरणामध्ये शेती व जंगले या दोन महत्त्वाच्या बाबी येतात. इ.स. १८८४ मध्ये १२,४१,५५३.५७ हेक्टर जमिनीपैकी ९,८८,४४६.७० हेक्टर (७९.६२ टक्के) जमीन ९६० सरकारी गावांमध्ये विभागली होती, तर २,५३,१०६.८१ हेक्टर (२०.३८ टक्के) जमीन ३९६ दुमाला गावांमध्ये विभागली होती. सरकारी गावांच्या